## - प्रकरण सहावे -

## बँकेची वैद्यकीय सुविधा

६.१ प्रस्तावना.

६.२ बालसंगोपन.

६.३ गरोदर महिलांसाठी मोफत स्त्री-रोग तपासणी शिबीरे व औषध सहाय्य.

६.४ मोफत नेत्र रोग शिबीर.

६.५ एक्स-रे मशिन.

६.६ रुग्णांची मोफत वहातूक.

६.७ समारोप.

.....

# प्रकरण सहावे

## बँकेची वैद्यकीय सुविधा

### ६.१) प्रस्तावना :-

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात कमीत कमी पैशात वैद्यकीय सल्ल्यांची व उपचाराची नितांत गरज असते. वैद्यकीय सल्ला ही एक आजची प्रमुख गरज आहे. पण हुपरीतील लोकांना त्यासाठी कोल्हापूर किंवा सांगलीला जावे लागत असे. हुपरीतील गरीब, कमी उत्पन्न गटातील लोकांना आवश्यक वैद्यकीय सल्ल्यासाठी कोल्हापूर, सांगलीसारख्या शहरामध्ये जाणे परवडणारे नव्हते. त्यामुळे हुपरीतील लोकांची गैरसोय होत होती. ही गोष्ट लक्षात घेऊन पैसाफंड बँकेने अत्यंत अल्प फी मध्ये आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे आणि हुपरीच्या जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर व परिचारिका, डॉ. चांदोलकर, वॉन्लेस हॉस्पीटल मिरज मधील डॉक्टर यांच्या सहकार्याने व सभासदांच्या मदतीने अनेक विध रोगांचे मूळ शोधून तत्संबंधी योग्य ती तपासणी उपचार व मार्गदर्शन करण्याचा उपक्रम बँकेने हाती घेतला. वैद्यकीय तपासणी रुग्णांच्या उपलब्धते-नुसार दोन-चार महिन्यानी संबंधित डॉक्टरांच्याकडून केली जाते व तपासणीचा अधिकृत रिपोर्ट ज्या त्या व्यक्तिस दिला जातो. बँकेकडून केल्या जाणाऱ्या या महत्वपूर्ण उपक्रमांची सविस्तर चर्चा या प्रकरणात केली आहे.

६•२) बालसंगोपन :-

२६ सप्टेंबर, १९६४ पासून दर महिन्याच्या ५ तारखेला नवजात अर्भकाना बी•सी•जी• ट्रीपल, पोलिओ, व्हिटॅमिन, ए•; बी•, व डी• आणि गोवर प्रतिबंधक लस मोफत दिली जाते• सदर कामी हुपरीच्या जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर व परिचारिका यांचे सहाय्य घेतले जाते•

यासाठी येणारा खर्च सन १९७९ पर्यन्त सभासदांच्या तिस-या शेअर्सच्या डिव्हीडंड देण्यामधून केला जात होता• सन १९८० नंतर बँकेने या कार्यासाठी चॅरिटी फंड वेगळा ठेवला आहे आणि त्यातून यावरचा सर्व खर्च केला जातो•

पुढील तक्ता क्र•६•१ वरून बँकेच्या या कार्याची सविस्तर माहिती मिळते•

तक्ता क्र.६.१

बालसंगोपन - बालकांची संख्या आणि खर्च (१९६६-ते १९९३)

| वर्ष | पोलिओ ट्रीपल इ. | | औषध | |
|---|---|---|---|---|
| | मुलांची संख्या | खर्च(रुपये) | मुलांची संख्या | खर्च(रुपये) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १९६६ | - | - | ३ | ४६ |
| १९६७ | - | - | २ | ४६ |
| १९६८ | - | - | १ | १२८ |
| १९६९ | - | - | ४ | ५५ |
| १९७० | १४८ | १८२ | ३ | १५ |
| १९७१ | ७६५ | १,४१० | १ | ९ |
| १९७२ | ४१३ | ६४५ | १ | - |
| १९७३ | ७२२ | ८२५ | - | - |
| १९७४ | २५६ | ३६७ | ८ | २,०३० |
| १९७५ | ६० | ८६ | ३३ | २,०८० |
| १९७६ | ४५५ | १,६६१ | - | - |
| १९७७ | २९५ | १,०७९ | - | - |
| १९७८ | १०९ | १,१३८ | - | - |
| १९७९ | ८५८ | १,१३० | ८२३ | २९१ |
| १९८० | २८९ | ६८५ | ४३० | १३८ |

.....

| ૧ | ૨ | ૩ | ૪ | ૫ |
|---|---|---|---|---|
| ૧૯૮૧ | ૪૨૯ | – | ૮૨૩ | ૨૯૧ |
| ૧૯૮૨ | ૬૭૭ | – | ૨૭ | ૫૦૬ |
| ૧૯૮૩ | ૭૨૮ | – | ૫૦૭ | ૩૦૦ |
| ૧૯૮૪ | ૬૭૮ | – | – | – |
| ૧૯૮૫ | ૬૮૩ | – | – | – |
| ૧૯૮૬ | ૧,૬૬૯ | – | – | – |
| ૧૯૮૭ | ૨,૬૩૯ | – | – | – |
| ૧૯૮૮ | ૨,૬૧૨ | – | – | – |
| ૧૯૮૯ | ૨,૪૪૭ | – | – | – |
| ૧૯૯૦ | ૨,૬૯૪ | – | – | – |
| ૧૯૯૧ | ૩,૩૬૧ | – | – | – |
| ૧૯૯૨ | ૧,૫૦૦ | – | – | – |
| ૧૯૯૩ | ૧,૬૦૪ | – | – | – |

बँकेच्या या कार्यात प्रत्येक वर्षी पोलीओ आणि ट्रिपल डोस घेणा-या बालकांची संख्या वाढत गेलेली दिसते. सारणी क्र.६.१ वरून असे निदर्शनास येते की, १९८० पासून बँकेने पोलिओ आणि ट्रिपल यासाठी खर्च केलेला नाही. कारण १९८० पासून हा खर्च सरकारकडून केला जातो आणि हे कार्य सरकारी डॉक्टर आणि परिचारिका करीत असतात. बँकेने या कार्यात पुढाकार घेतला. हे बाल आरोग्याच्या दृष्टीने कौतुकास्पद आहे. दिनांक २ एप्रिल,१९८९ पासून प्रत्येक महिन्यांच्या पहिल्या रविवारी कोल्हापूरचे बालरोग तज्ञ डॉ. अशोक शी. जगताप, हे ११-०० ते १-०० या वेळेत उपस्थित राहून १ वर्षाच्या आतील बालकांची मोफत तपासणी करून सल्ला देण्याचे कार्य सुरू आहे. तसेच रुपये २०/- पर्यन्तची मोफत औषधे गरीब बालकांना देऊन त्यांचे आरोग्य रक्षण करण्याचे कार्य बँकेतर्फे होत आहे.

६.३) गरोदर महिलांसाठी मोफत स्त्री-रोग तपासणी शिबीरे व औषध सहाय्य :-

२६ सप्टेंबर, १९६४ पासून सभासदांच्या दुस-या शेअर्सच्या डिव्हीडंड देणगीमधून गरोदर स्त्रियांना प्रसुतीपूर्वी तीन महिने व प्रसुतीनंतर सहा महिने मुदतीपर्यन्त शक्तीवर्धक औषधे देण्याचे कार्य सुरू होते. परंतु या संधीचा पुरेसा उपयोग संबंधितांनी करून घेतला नाही. त्यामुळे त्यातील बरीच रक्कम शिल्लक राहीली आहे.

त्यानंतर काही दिवसांनी किर्लोस्कर मासिकांत नामवंत डॉक्टर सरदेसाई यांचा, "मुलाचे मेंदूची भरपूर वाढ झालेस मुले ज्ञानेश्वरा समान ज्ञानी होती", अशा आशयाचा लेख प्रसिध्द झाला. याचा उपयोग

करून घेऊन ज्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी बँकेने या कामी महाराष्ट्र राज्य शिक्षणशास्त्र संस्थेचे मान्यवर डॉ॰ पानेस यांची भेट घेतल्यावर त्यांनी याबाबत सविस्तर माहिती देऊन सदर संस्थेचे संस्थापक डायरेक्टर स्वर्गीय आ॰बा॰ नाईक यांच्या सम्मतीने दुपरी गावी येऊन आहार व शरीरशास्त्र आणि प्रोटीनची गरज याबद्दलची सुबोध माहिती सोप्या भाषेत जमलेल्या सर्व मंडळींना देऊन मंत्रमुग्ध करून टाकले॰

सन १९७१ मध्ये याप्रमाणे गरोबर स्त्रियांना प्रोटीन देण्याचे निश्चित करून व त्याकरिता युनिकेम कंपनीचे संस्थापक जनरल मॅनेजर डॉ॰मोदिसो। यांनी कोल्हापूरचे प्रोटीनचे प्रतिनिधी डॉ॰ चौगलेसो। यांच्या शिफारशी करून सवलतीच्या दराने देण्याचे मान्य केले व प्रत्यक्ष भेटीचे वेळी डॉ॰ मोदिसो। यांनी ग्रामीण भागात ही पहिलीच योजना असल्याने याबाबत सर्व तोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले॰

याप्रमाणे प्रोटीन मिळण्याचे निश्चित झाल्यावर सदर मोफत प्रोटीन वाटपाचा पहिला कार्यक्रम तारीख २८ मे,१९७१ रोजी कोल्हापूरचे नामवंत डॉ॰ मुळीकसो। यांच्या अध्यक्षतेखाली युनिकमचे डॉ॰ चौगलेसो। यांच्या हस्ते वाटप करण्याचा कार्यक्रम पार पडला॰

या योजनेअंतर्गत १९७०-७१ सालात रुपये ३८९/६ खर्च झाला आहे व इतर स्त्रियांना रुपये १८९/- ची शक्तीवर्धक औषधे संस्थेमार्फत घेऊन देण्यात आली आहेत॰

या योजनेतून स्त्रियांच्या औषधासाठी केलेला खर्च आणि लाभधारक स्त्रियांची संख्या या संबंधीची माहिती तक्ता क्र॰६॰२ मध्ये दिली आहे॰

तक्ता क्र.६.२

गरोदर महिलांसाठी मोफत स्त्री-रोग तपासणी व औषध सहाय्य -

लाभधारक स्त्रिया व बँकेने औषधासाठी केलेला खर्च रुपये.

| वर्ष | लाभाधारक | खर्च (रुपये) | शिबीर संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९६४-६५ | १ | ६२ | - |
| १९६५-६६ | - | - | - |
| १९६६-६७ | १ | ६० | - |
| १९६७-६८ | - | - | - |
| १९६८-६९ | - | ९७ | - |
| १९६९-७० | - | - | - |
| १९७०-७१ | १ | १८९ | - |
| १९७१-७२ | ६९ | ९२९ | - |
| १९७२-७३ | - | ४०८ | - |
| १९७३-७४ | - | ८३ | - |
| १९७४-७५ | १०१ | ३,५९२ | - |
| १९७५-७६ | - | - | - |
| १९७६-७७ | - | - | - |
| १९७८-७९ | ३३ | ३,०४७ | - |
| १९७९-८० | २७९ | ५,३१३ | २ |
| १९८०-८१ | ७८ | ३,६०४ | - |

.....

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १९८१-८२ | - | ३,३४३ | ६ |
| १९८२-८३ | ६४ | २,४३७ | ५ |
| १९८३-८४ | ९७ | २,३८९ | ५ |
| १९८४-८५ | - | २,३८६ | ६ |
| १९८५-८६ | ४५ | २,५९८ | ६ |
| १९८६-८७ | २८ | १,२५५ | ६ |
| १९८७-८८ | २१ | ८२२ | ६ |
| १९८८-८९ | २४ | ७८७ | ६ |
| १९८९-९० | ५६ | २,०४७ | ६ |
| १९९०-९१ | ३७ | १,३६३ | ६ |
| १९९१-९२ | - | - | - |
| १९९२-९३ | ६१ | २,९७१ | ६ |

सारणी क्र•६•२ वरुन असे दिसून येते की, ही योजना सन १९६४ मध्ये सुरु झाली• पण पहिल्यांदा या योजनेचा लाभ जास्त स्त्रियांनी घेतलेला नाही• सन १९७८–७९ पासून मात्र या योजनेचा लाभ प्रत्येक वर्षी स्त्रिया घेत आहेत•

एकंदरीत ज्या लोकांना आर्थिक दौर्बल्य आले आहे व ज्यांना आपल्या शारीरिक आजारावर इच्छा असूनं चांगल्या वैद्याकडून उपचार करुन घेता येत नाहीत• अशांना वेगवेगळ्या रोगावरील विशेष तज्ञ डॉक्टरांना संस्थेत बोलावून लोकांची तपासणी करुन त्यांना मोफत औषध व सल्ला दिला जातो• आणि डॉक्टरांचे सुचनेप्रमाणे प्रत्येकी रुपये ४०/– पर्यन्तची आवश्यक औषधे गरीब स्त्रियांना मोफत दिली जातात•

६•४) <u>मोफत नेत्र रोग शिबीर</u> :-

मनुष्य जीवनाला आवश्यक असणाऱ्या अनेकविध गोष्टींचे उपक्रम श्री पैसाफंड बँकेच्या सहकार्याने वेळोवेळी पार पडले जातात• डोळा हे माणसाचे सर्वस्व आहे• दृष्टीसुखाचा फार मोठा आनंद डोळ्यामुळे आपण घेत असतो• याची योग्य ती निगा राखण्याचे काम मनुष्याकडून घडतेच नाही• यामुळे बऱ्याचशा लोकांच्या डोळ्यांत फार मोठ्या प्रमाणावर दोष निर्माण होतात• शिवाय हा एक नाजूक अवयव असल्याने ह्यावर डॉक्टरी उपचार करुन घेणे अत्यंत खर्चिक ठरते•• या सर्व गोष्टी लक्षात घेऊन श्री पैसाफंड बँकेच्या आर्थिक साह्याने वर्षातून दोन नेत्र शिबीराचे आयोजन केले जाते• यासाठी धान्य कर्ज विभागाच्या शेअर्सचा डिव्हीडंड सर्व सभासदांनी कमी उत्पन्नाच्या

लोकांना चष्मे व नेत्र सहाय्य देण्यासाठी देऊ केला आहे. प्रत्येक वर्षी नेत्र शिबीराच्या वेळी डोळ्यावर शस्त्रक्रिया केलेल्या लोकांना सात दिवस रोज दोन वेळचा चहा नाष्टा जेवण व औषध सहाय्य मोफत दिले जाते.

दिनांक ८ मार्च, १९७१ पासून सुरू केलेल्या बँकेच्या या कार्याची सविस्तर माहिती तक्ता क्र.६.३ मध्ये दिली आहे.

तक्ता क्र.६.३

मोफत नेत्र रोग शिबीर - लाभधारक आणि खर्च.

| वर्ष | लाभधारक | खर्च | शस्त्रक्रिया संख्या | मोफत चष्मे लाभधारक | चष्मेसाठी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १९७०-७१ | ४९ | उ.ना. | उ.ना. | ७ | उ.ना. |
| १९७१-७२ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| १९७२-७३ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| १९७३-७४ | २५० | १,४०७ | ३७ | ३७ | उ.ना. |
| १९७४-७५ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| १९७५-७६ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| १९७६-७७ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| १९७७-७८ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| १९७८-७९ | ३९९ | ८३० | ४३ | ४३ | २८० |
| १९७९-८० | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १८ | ३७९ |

.....

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ५२ | उ.ना. |
| १९८१-८२ | २२२ | ३,९०५ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| १९८२-८३ | उ.ना. | उ.ना. | ३४ | उ.ना. | उ.ना. |
| १९८३-८४ | उ.ना. | उ.ना. | ६९ | उ.ना. | उ.ना. |
| १९८४-८५ | उ.ना. | ७९८ | ६२ | उ.ना. | उ.ना. |
| १९८५-८६ | ३७० | ८७८ | ६७ | १४ | उ.ना. |
| १९८६-८७ | ३६८ | २,९९९ | ९१ | ११ | उ.ना. |
| १९८७-८८ | ४५० | ३,३४४ | ७० | ३ | १०१ |
| १९८८-८९ | ३६६ | २,३२३ | ३७ | १२ | ३६५ |
| १९८९-९० | ५१७ | ५,४२२ | ६५ | १२ | ४०० |
| १९९०-९१ | ६७९ | ७,०५४ | ९४ | २१ | ७४० |
| १९९१-९२ | ४९५ | ५,०४७ | ७२ | ६ | १२० |
| १९९२-९३ | ४६३ | ७,१९९ | ६३ | २५ | ८६० |

तक्ता क्र.६.३ वरून असे स्पष्ट दिसून येते की, बँकेने सुरू केलेल्या या योजनेचा लाभ जास्तीत जास्त लोक घेत आहेत.. त्याचप्रमाणे बँकेकडून या योजनेवरती केला जाणारा खर्च देखील वाढत आहे.

सन १९८२-८३ मध्ये ९९ लोकांनी दातांची तपासणी करुन घेतली. यापैकी रुपये ४९६/- बँकेने औषधाकरता खर्च केले.

६.५) <u>एक्स-रे मशिन</u> :-

हुपरीचे प्रसिध्द डॉक्टर, डॉ. एन.डी. शिंदे यांना मातृसेवा हॉस्पीटलकडे सदर मशिन वार्षिक रुपये ७,०००/- भाड्याने दिली आहे. ही योजना दिनांक २७ ऑगष्ट, १९८९ पासून कार्यान्वित असून या योजनेचा लाभ १९८८-८९ पर्यन्त २,१४९ लोकांनी घेतला आहे.

६.६.) <u>रुग्णांची मोफत वाहतूक</u> :-

जेव्हा गरजेच्या वेळी रुग्णाला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मोठ्या दवाखान्यात तांबडतोब घेऊन जाण्याची आवश्यकता भासते, अशावेळी श्री पैसाफंड बँक आपल्या मालकीचे वाहन गरजू लोकांना त्यांच्या रुग्णाला कोल्हापूर, मिरज, सांगली या सारख्या दवाखान्यात नेण्यासाठी मोफत देते.

.....

६.७) <u>समारोप</u> :-

बँकेने सुरुवातीपासून आपल्या सभासदांना कमीत कमी अर्थात जास्तीत जास्त उपयुक्त सेवा पुरविण्याचे महत्वपूर्ण कार्य हाती घेतले आहे. त्यापैकी वर उल्लेख केलेल्या वैद्यकीय सुविधा इतकेच नव्हे तर थर्मामीटर, हॉट वॉटर बॅग, बेड पॅनस वगैरे शुश्रुषा साहित्य सभासदांना अल्प भाड्याने देण्याची व्यवस्था बँकेने सन १९५३ पासून सुरु केली आहे. याप्रमाणे कमी पैशात कमी वेळेत उपयुक्त वैद्यकीय सल्ला लोकांना उपलब्ध करुन देण्याचा महत्वपूर्ण वैद्यकीय उपक्रम बँकेने हाती घेतला आहे. त्याचा अनेक लोक लाभ घेत आहेत.

.....